## कलम ४ (१) (ख)(आठ) नमुना (क)

विधि व न्याय विभाग,कार्यासन सोळा, मंत्रालय, मुंबई   कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

उपरोक्त प्रमाणे विधि व न्याय विभाग यांनी कळविलेली श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर, मुंबई ची माहिती पुढीलप्रमाणे अद्यावत करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन-सामान्यां-साठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था समिती** | १) मा.श्री.आदेश चंद्रकांत बांदेकर,अध्यक्ष<br>२) श्री.संजय हरिचंद्र सावंत, कोषाध्यक्ष<br>३) श्रीम. विशाखा शरद राऊत, सदस्य<br>४) श्र.सुबोध शरद आचार्य, सदस्य<br>५) श्रीम.वैशाली राजेश पाटणकर, सदस्य<br>६) श्रीम.आरती किशोर साळवी, सदस्य<br>७) श्री.सुनिल कारभारी पालवे, सदस्य<br>८) श्री.दशरथ गिरी, | राज्य शासनाच्या कोणत्याही आदेशास अधीन राहून मंदिर विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था लावणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजाअर्चा, समारंभ व उत्सव साजरे करण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सुखसोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्त व्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील. तसेच, या व्यतिरीक्त समितीची कर्तव्ये | समितीने आपले कामकाज चालविण्यासाठी स्वत: ठरविल अशा कालांतराने वेळोवेळी सभा भरविल. | नाही. | समितीचे कामकाजासाठी समितीच्या सोयीनुसार वारंवार सभा आयोजित करण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सदस्य<br>९) श्री.राजाराम महादेव देशमुख, सदस्य<br>१०) श्री.भास्कर रामा शेट्टी, सदस्य<br>११) श्रीम. श्वेता अभिजित अवर्सेकर, सदस्य | पुढीलप्रमाणे आहेत :-<br>अ) जमाखर्चाचा वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.<br>ब) मालमत्तेचा व जमाखर्चाचा हिशेब व अभिलेख ठेवणे.<br>क) विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाचे लेखा परिक्षित करुन घेणे.<br>ड) सदस्याचे कार्यकारी अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व फी इ. देणे.<br>ई) गहाळ झालेल्या मालमत्तेची व येणे असलेल्या रकमेची वसूल करणे.<br>फ) विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित दावे, खटले न्यायालयीन कार्यवाही न्यायालयापुढे/प्राधिकरणापुढे दाखल करणे व त्यासंबंधात बचाव करणे.<br>ग) मालमत्तेची तपासणी करणे व अतिक्रमण असल्यास दूर करणे.<br>ह) राज्य शासनास विवरणे, आकडेवारी, हिशेबाची माहिती पुरविणे.<br>विश्वस्त मालमत्ता व तिचे कामकाज, व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी करणे.<br>३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये असलेली स्थावर | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मालमत्ता राज्य शासनाच्या मंजूरीने एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता भाडेपट्ट्याने देऊ नये, गहाण टाकू नये विकू नये किंवा अन्य संक्रमित करु नये.<br>४) रुपये पाच हजार पेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर दागिने इ. शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय तारण किंवा विकता येणार नाही.<br>५) शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय कर्ज घेता येणार नाही.<br>६) समितीला अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता अधिकार प्रदान केले आहेत. | | | |

**कलम ४ (१) (ख)(आठ) नमुना (क)**

विधि व न्याय विभाग,कार्यासन सोळा, मंत्रालय, मुंबई कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

उपरोक्त प्रमाणे विधि व न्याय विभाग यांनी कळविलेली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची माहिती पुढीलप्रमाणे अद्यावत करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन-सामान्यां-साठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)** | मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. क्र. ९८/२०२१ सिव्हील ॲपलिकेशन क्र. ११९७३/२०२१ मध्ये दि.१३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मधील अस्तीत्वात असलेली व्यवस्थापन समिती बरखास्त केली असून संस्थानाच्या कामकाज्याच्या | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरांमध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा, अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी | समितीने आपले कामकाज चालविण्यासाठी वेळोवेळी ती ठरविल अशा कालांतराने अशा वेळी सभा भरविल. तथापि, दोन सभेमध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक काळ जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. | नाही. | समितीचे कामकाजासाठी समितीच्या सोयीनुसार वारंवार सभा आयोजित करण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियंत्रणासाठी तदर्थ समिती नेमली आहे. सदर तदर्थ समितीमध्ये<br>१) मा.प्रधान जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर,<br>२) मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व ३) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा समावेश आहे. | विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे इ. समितीची कर्तव्ये आहेत. | | | |

**कलम ४ (१) (ख) (आठ) नमुना (क)**

विधि व न्याय विभाग,कार्यासन सोळा, मंत्रालय, मुंबई कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

उपरोक्त प्रमाणे विधि व न्याय विभाग यांनी कळविलेली श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरची माहिती पुढीलप्रमाणे अद्यावत करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन-सामान्यां-साठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर** | समिती कार्यरत आहे. तथापि, सदर समितीची मुदत द्.०३.०७.२०२२ रोजी संपलेली आहे. नवीन समिती स्थापन करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.<br>समितीच्या अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा आहे. एकूण १५ सदस्यांची समिती आहे. त्यामध्ये एक समितीसदस्य निलंबित झाला आहे.<br>१. पद रिक्त, अध्यक्ष | मंदिरातील दैनिक उपायने, दक्षिणा, भोग, देणग्या, वर्गण्या व तशाच प्रकारच्या वस्तू गोळा करणे व त्यांची आणि मंदिराचा निधी कोणतेही किंमती दस्तऐवज असल्यास ते व जडजवाहिर आणि अलंकार यांची सुरक्षित अभिरक्षा करणे व समितीस योग्य वाटेल अशा उपायनाचा विनियोग करील.<br>पंढरपूर मंदिरे समितीला पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ च्या कलम ३२ अन्वये उपलब्ध करुन दिलेल्या समितीचे कर्तव्य व अधिकार आहेत. | पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ च्या कलम ३० अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून समितीचे कामकाज चालविण्यासाठी विहित करण्यात येईल अशा कालांतराने पंढरपूर येथे सभा घेण्यात येईल. | नाही | समितीचे कामकाजासाठी समितीच्या सोयीनुसार वारंवार सभा आयोजित करण्यात येते. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २. श्री.गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाराज (औसेकर), सह अध्यक्ष<br>३. मा.आमदार श्री.रामचंद्र शिवाजी कदम, सदस्य<br>४. श्रीम.शकुंतला विजयकुमार नडगिरे, सदस्या<br>५. डाॅ.श्री. दिनेशकुमार सदाशिव कदम, सदस्य<br>६. श्री.सचिन नागनाथ अधटराव, सदस्य (निलंबित)<br>७. श्री.भास्करगिरी गुरू किसनगिरी बाबा, सदस्य<br>८. श्री.संभाजी हिरालाल शिंदे, सदस्य<br>९. मा.आमदार श्री. सुजितसिंह मानसिंह ठाकूर, सदस्य<br>१०. श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर नामदेव देशमुख (जळगांवकर), सदस्य<br>११. ॲड. श्रीम. माधवी | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्रीरंग निगडे, सदस्या<br>१२. श्री.ह.भ.प.प्रकाश रूस्तुमराव जवंजाळ, सदस्य<br>१३. श्री भागवत भुषण अतुलशास्त्री अशोकराव भगरे, गुरूजी, सदस्य<br>१४. श्री.ह.भ.प. शिवाजीराव सदाशिवराव मोरे, सदस्य<br>१५. सौ.साधना नागेश भोसले, अधअयक्ष, पंढरपूर नगरपालिका, पदसिध्द सदस्या | | | | |

**कलम ४ (१) (ख)(आठ) नमुना (क)**

विधि व न्याय विभाग,कार्यासन सोळा, मंत्रालय, मुंबई  कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.

उपरोक्त प्रमाणे विधि व न्याय विभाग यांनी कळविलेली देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर देवस्थानाची माहिती पुढीलप्रमाणे अद्यावत करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ट | किती वेळा घेण्यात येते | सभा जन-सामान्यां-साठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **देवस्थान व्यवस्थापन समिती,पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर** | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ५६ आर.आर. अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ०७.०४.२०२१ रोजीच्या शासन राजपत्रान्वये अस्तित्वात असलेली देवस्थान व्यवस्थापन समिती बरखास्त करून सदर देवस्थानावर प्रशासक तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांची एक वर्षाच्या | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ५६ अन्वये उद्दिष्टे ठरविण्यात आलेले आहेत. | मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० च्या कलम ५६ जे अन्वये प्रख्यापित केलेल्या अधिकारान्वये समितीकडून घेण्यात येते. | नाही. | समितीचे कामकाजासाठी समितीच्या सोयीनुसार वारंवार सभा आयोजित करण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कालावधीकरीता न्मणूक करण्यात आली. सदर नेमणूकीस शासन राजपत्र दि. ०७.०४.२०२२ अन्वये एक वर्षाकरीता मुदतवाढ दिलेली आहे. | | | | |